MHNG100014782020

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७७४/२०२०
राज्य – विरुध्द – विलास

## निशाणी क्रमांक १ वर आदेश
## (पारित दिनांक १० मार्च, २०२६)

प्रस्तुतचे दोषारोपपत्र हे महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ ई अन्वये दाखल करण्यात आलेले आहे.

२. अभिलेखाचे अवलोकन केले. विशेष म्हणजे प्रकरणामध्ये रासायनिक पृथकरणाचा अहवाल दाखल आहे.

३. आरोपी गैरहजर म्हणुन न्यायालयाने गैरजमानती अधिपत्र निर्गमित केले. परंतु, त्याचा काही उपयोग झाला नाही.

४. मार्च,२०२० पासून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

५. आरोपी हा गैरहजर आहे. भविष्यात कधी येईल ते सांगता येणार नाही. ५ वर्षापासुन खटला प्रलंबित आहे. असे दिसून येते. खटला हा संक्षिप्त स्वरुपाचा आहे. त्यामुळे प्रकरण प्रलंबित ठेवून काहीही उपयोग होणार नाही. त्यामुळे मी प्रकरणात फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २५८ अन्वये कार्यवाही करीत आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## : आदेश :

१. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५८ अन्वये प्रकरण हे बंद करण्यात येऊन आरोपी यांस विना दोषारोप मुक्त करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल हा योग्य त्या कार्यवाहीसाठी राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात यावा.

३. सबब प्रकरण नस्ती करण्यात येते.

उमरेड
दिनांक : १०.०३.२०२६.

**( रा.भा. डोळे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरेड

<u>**: प्रमाणपत्र :**</u>

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव –

न्यायालयाचे नाव – न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उमरेड

पी.डी.एफ. फाईल अपलोड केल्याचा दिनांक –

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी – ३